# ग्रामीण साहित्य आणि वास्तव

**प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख**
मराठी विभाग प्रमुख, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर.



**प्रास्ताविक :**

साठोत्तरी कालखंडात प्रवाही झालेली ग्रामीण साहित्याची चळवळ ८० नंतरच्या काळात जोरकसपणे कार्यरत झाल्याचे दिसून येते. पुढे मात्र गतिरोधक लागल्याप्रमाणे तिच्यात थांबलेपण आले. ग्रामीण साहित्याची पूर्वपरंपरा पहायचे म्हटले तर महात्मा फुले यांच्या साहित्यापर्यंत जाता येते. महात्मा फुले यांनी ग्रामीण जीवन वास्तवाला प्रतिबिंबीत करून ग्रामीण साहित्याचा पाया घातला असे म्हटले तर वावगे ठरू नये. याच परंपरेत पुढे कृष्णाराव भालेकर, मुकुंदराव, धनुर्धारी पाटील यांनीही ग्रामीण जगण्याचे चित्र आपल्या लेखनातून उभे करण्याचा प्रयत्न केला.

महात्मा जोतिरावांचे ग्रंथकार सभेस पत्र चळवळीसाठी प्रेरक ठरले. विचारांच्या दिशा निश्चित होत गेल्या. सभोवताच्या प्रश्नांच्या जाणीव तीव्रतेने होऊ लागली. १९२० नंतर झालेला गांधीवादाचा उदय आणि महात्माजींची 'खेड्यांकडे चला' ही हाक ग्रामीण जीवनानुभव अभिव्यक्तीसाठी प्रेरणादायी ठरली. हा काळ मात्र फडके-खांडेकरांचा होता. त्यामुळे साहजिकच कलावाद आणि जीववादाच्या प्रभावातूनच ग्रामीण साहित्यिकांनी लेखन केले. तरी परंतू श्री.म.माटे यांच्या लेखनाची प्रेरणा मात्र पूर्णतः सामाजिक स्वरूपाची असलेली दिसून येते. कवी यशवंत, ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, भा.रा.तांबे, चंद्रशेखर यांच्या लेखनातून ग्रामीण जीवनाविषयीचे प्रतिबिंब उमटले खरे परंतू त्याचे स्वरूप मात्र माहितीविनाथ होते. एकूणच १९२०-४५ पर्यंतच्या कालखंडाने ग्रामीण साहित्याला भरीव काही दिले असे म्हणता येणार नाही. परंतू ग्रामीण साहित्याची पाळेमुळे रूजविण्याचा प्रयत्न केला हे नाकारून चालणार नाही.

पुढील काळात मौज सत्यकथेतून लिहिणारी एक पिढी तयार होत गेली. द.मा.मिरासदार, शंकर पाटील, आण्णाभाऊ साठे, आनंद यादव, शंकर खरात, हमीद दलवाई, रा.रं.बोराडे, रणजित देसाई, सखा कलाल , बाबा पाटील, चारूता सागर, भास्कर चंदनशिव, महादेव मोरे आदि लेखकांची एक पिढी १९६० च्या दरम्यान निर्माण झाली. या पिढीने ग्रामीणसाहित्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची विचारधारा जोपासली. खऱ्या अर्थाने १९६० नंतर ग्रामीणसाहित्याची चळवळ उदयाला आली. या चळवळी मराठी साहित्याला नवा विचार, नवी मांडणी, नवे अनुभवविश्व , नवी भाषाशैली आदि प्रकारातून नवता प्राप्त करून दिली.

साठोत्तरी ग्रामीण लेखकांनी जाणीवपूर्वक ग्रामीण भागातील समस्यांचे चित्रण साहित्यात आणले. या पहिल्या पिढीतील लेखकांनी हा वारसा जोपासत ग्रामीण साहित्याची चळवळ घराघरापर्यंत नेली. शिक्षणाने आत्मभान आलेला ग्रामीण तरूण या पिढीचा हात धरून लिहिता झ ाला व १९६० ते १९९० पर्यंत ग्रामीण साहित्याने आपले स्वतःचे स्थान निर्माण केले. काळाच्या ओघाबरोबर ग्रामीण साहित्यातही संक्रमण अवस्थांतर होत गेले. १९८०-९० नंतर ग्रामीण जीवनाला आलेली गती, झपाट्याने होत जाणारे बदल, २१ व्या शतकाने दिलेले तंत्रज्ञान, संगणकीय जीवन, माहितीच्या स्फोटाचे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण, वाढती स्पर्धा यातून ग्रामीण माणसाच्या जगण्याला आलेले झपाटलेपण या नंतरच्या पिढीने प्रत्ययकारिकतेने अधोरेखित केले आहे. श्रीकांत देशमुख, राजन गवस, सदानंद देशमुख, शेषेराव मोहिते, इंद्रजित भालेराव, आसाराम लोमटे, कृष्णात खोत, आप्पासाहेब खोत, विजय जावळे, जगदीश कदम, मथू सावंत, अनुराधा पाटील, भारत काळे पासून ते आजच्या वर्तमानाचे प्रतिनिधित्व करणारे एकनाथ पाटील, प्रवीण बांदेकर, अशोक कोळी, अजय कांडर, विरधवल परब, बालाजी इंगळे, प्रमोद माने अशी कित्येक नावे सांगता येतील.

एकूणच ९० नंतरच्या ग्रामीण साहित्याचे स्वरूप या शोधनिबंधाच्या अनुषंगाने ग्रामीण वास्तव आणि साहित्य या विषयासंदर्भात निरीक्षणे नोंदविली आहेत.

**वर्तमान वास्तव आणि ग्रामीण साहित्य :**

ग्रामीण साहित्यिकांनी त्या त्या काळातील प्रश्नोप्रश्नांना निर्मितीच्या केंद्रस्थानी ठेऊन आपली अभिव्यक्ती सिद्ध केली आहे. ग्रामीण समाज जीवाला भिडणाऱ्या वास्तवाचे शब्दरूप चित्र कथा , कविता, कादंबरी, नाटक आदि वाङ्मय प्रकरातून प्रतिनिधीत झाले आहे. १९६० नंतर ग्रामीण महाराष्ट्रात आमुलाग्र बदल घडून आला. कै.यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगाती ग्रामीण नेतृत्वाच्या विचारातून काही महत्वपूर्ण कायदे पास झाले. ग्राम स्तरावर शिक्षणाच्या सोयी झाल्या. कृषी महाविद्यालये आली, सहकार क्षेत्राचा विकास झाला. शेती उद्योगात क्रांतीकारी बदल झाले. या बदलातून ग्रामीण समाजाला आत्मभान निर्माण झाले. या आत्मभानाच्या शोधातून निर्माण झालेल्या प्रश्नांचे उत्तर शोधणारा तरूण लिहिता झाला. त्यांच्या लेखनीतून अभिव्यक्त झालेल्या प्रश्नांचे स्वरूप अधोरेखित करताना डॉ.द.ता.भोसले लिहितात, "ग्रामीण जीवनातील सर्व प्रकारची अभावग्रस्तता, शेतकऱ्याचे दारिद्र्य, त्यांचे अज्ञान, त्यांचे होणारे शोषण, दुष्काळामुळे होणारी होरफळ, त्यांचा

कर्जबाजारीपणा, त्यांचे शेती आणि जनावरांवरील प्रेम, शेतमालाला न मिळणारा भाव, चुलीपर्यंत पोचलेले राजकारण आणि गटातटाचे शत्रूत्व, कौटुंबिक परवशता यासारखे शेतकऱ्यांच्या 'जीवनचे लचके तोडणारे प्रश्न' या लेखकांनी मन:पूर्वक आणि मन:प्रेरक स्वरूपात मांडले"[१] डॉ.भोसले यांनी ग्रामीण साहित्यिकांनी वर्तमान समाजवास्तवाला कशाप्रकारे शब्दबद्ध केले ते स्पष्ट करतानाच या साहित्यिकांची अभिव्यक्ती चौफेर कशी होत होती ते ही सिद्ध केले आहे.

१९९० नंतरच्या एकूणच मानवी जीवनाला प्रचंड गतिमानता प्राप्त झाली. माणसाला यंत्राचे स्वरूप आले. ग्रामीण जगण्याचा चेहरामोहराच बदलून गेला. विकासाच्या गतीत ग्रामीण माणूस आणि त्याचे जगणे कोसोदूर जाऊन पडले. या वास्तवातून उद्‌भवलेल्या प्रश्नांचे चिंतन या पिढीतील लेखकांनी प्रत्ययकारिकतेने अधोरेखित केले आहे. समाज आणि समाजातील बदल हे लेखकाच्या निर्मितीचे मूलद्रव्य असते. या मूलद्रव्यानुरूप लेखक आपले विचार मांडीत असतात. १९८० ते २००० हा काळ ग्रामीण समाज एका बाजूने बदलत होता, तर दुसऱ्या बाजूने ग्रामीण म्हणून असणारी त्यांची ओळख पुसली जात होती. आधुनिकीकरणाच्या आहारी गेलेला ग्रामीण माणूस, भोगवादी आणि चंगळवादी मनोवृत्तीच्या आहारी जाऊन आसमानी बरोबरच सुलतानी संकटाच्या दोरखंडात अधिकच अवळला गेला. शहराती मोठे व्यापारी, कारखानदार, बिल्डर्स, भ्रष्ट राजकारणी, सरकारी नोकरदार अशा पैसेवाल्यांनी जमीनी खरेदी केल्या. यातून ग्रामीण माणसांच्या वाट्याला कंगालपण येत गेले. वर्षाआड वर्ष सातत्याने पडत जाणारा दुष्काळ आणि बदलती जीवन संस्कृती याला तोंड देणे अशक्य झाल्याने अनेक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याचे संकट ओढावले. म्हणजेच ग्रामीण समाजवास्तवाला पुन्हा त्याच प्रश्नांनी वेढून टाकले. या वास्तवाला अधोरेखित करणारे ग्रामीण साहित्यिक कमी पडलेले दिसतात. नागनाथ कोत्तापल्ले, मोहन पाटील, राजन गवस आदि बोटावर मोजण्या इतक्याच लेखकांनी हे चित्र साकार केले आहे.

वर्तमान ग्रामीण समाजवास्तव शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दलित शोषितांवरील अत्याचार, अतिवृष्टी, खतांचे भाव, बी-बियाणे दर, रोजगाराचे दर, विजेचे भारनियमन, शेतीमालाचे भाव आणि चुकीची आकडेमोड करणारे उत्पादन खर्च, अवकाळी पाऊस, शासकीय धोरणांचा अभाव, पिकांची नसाडी अशा एक ना अनेक प्रश्नांनी अक्षरश: वेड लावणारी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या परिस्थितीला परिणामसकट ताकतीने मांडून जाब विचारणाऱ्या कलाकृतीची खऱ्या अर्थाने आज गरज निर्माण झालेली आहे. समाज हा एका अर्थाने साहित्याची जन्मभूमी असतो. या समाजातच साहित्याला पोषक ठरणारी विपुल सामुग्री विखुरलेली असते. याचप्रकारची मूलद्रव्य आज समाजात पावलोपावली अनुभवास मिळतात. परंतू या परिस्थितीची प्रतिक्रिया उमटाव्या तेवढ्या तीव्रतेने उमटताना दिसत नाहीत. ग्रामीण लेखकाच्या या भूमिकेला अधोरेखित करताना मोहन पाटील लिहितात. "शेती आणि शेतकरी, गाव आणि गावगाडा यामध्ये १९८० नंतर व्यापारीकरण, तरूणांची बदललेली मानसिकता, बागायती शेतीवरील बागाईतदारांची मिजास त्याचे चित्रणही मराठी ग्रामीण साहित्यात पुरेसे आलेले नाही. असे म्हणावे लागते."[२] पाटील यांनी व्यक्त केलेली खंत आजही अनुत्तरीत असल्याचे मान्य करावेच लागेल. म्हणावे तेवढ्या ताकतीने ग्रामीण समान वास्तव आजही चित्रित होतय असे म्हणणे थोडे धाडसाचे होईल.

**ग्रामीण समूहभावाचे चित्रण :**

समूहभावाचे चित्रण हा ग्रामीण साहित्याचा मूलभूत विशेष म्हणता येईल. मी बरोबर आम्ही या जाणीवेतून ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहिली होती. प्रारंभीच्या ग्रामीण साहित्यिकांनी या विशेषाला केंद्रस्थानी ठेवून आपआपल्या अनुभवांना शब्दरूप दिले आहे. जीवन आणि साहित्य या दोघांमधील अन्योन्य संबंध लक्षात घेऊन पहिल्या पिढीतील ग्रामीण साहित्यिकांनी लेखन केले. ग्रामीण माणसाला , ग्रामीण जगण्याला आणि एकूणच ग्रामीणत्वाला स्पर्शणाऱ्या प्रश्नांची सांगोपांग दखल घेऊन त्याची उत्तरे देण्यास प्रवृत्त करायला लावणाऱ्या अनेक कलाकृती ग्रामीण साहित्यात व्यंकटेश माडगूळकर(माणदेशी माणसं), आनंद यादव (खळाळ), रा.रं.बोराडे (पेरणी), शंकर पाटील (वळीव) आदि कथाकारांनी कथात्मक साहित्यातून तर आनंद यादव (हिरवे जग), राजा महाजन (डहाळी), सदाशिव माळी (फुलमाळ) याच प्रवाहात पुढे पुरूषोत्तम पाटील, ना.धो.महानोर, विठ्ठल वाघ शंकर बडे अशी कित्येक नावं घेता येतील. या पिढीने ग्रामीण समुहभावाचे चित्रण सामाजिक बांधिलकीची नेमकी जाणीव १९६० ते १९९० पर्यतच्या एकूणच ग्रामीण साहित्यातून प्रत्ययास येते. लेखकाच्या सामाजिक जाणीव प्रकटीकरणातूनच त्याचे समुहभाव चित्रणाचे स्वरूप स्पष्ट होते. लेखकाच्या या अभिव्यक्ती विशेषाला साकारताना नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "मानवी सामर्थ्यावरचा प्रचंड विश्वास, व्यापक मानवासमूहाच्या दृष्टीने केलेला परिवर्तनवादी विचार, त्यासाठीची संघर्षशीलता आणि मूल्यात्मक दृष्टीने समाजवास्तवाचा अन्वयाची लावण्याची कुवत या सगळ्या गोष्टी ज्या साहित्यिकाजवळ एकवटलेल्या आहेत. त्यालाच खऱ्या अर्थाने 'सामाजिक जाणीव' प्रकट करता येईल. त्याच्याच कलाकृतीचे शक्तिकेंद्र ही सामाजिक जाणीव होईल."[३] कोत्तापल्ले यांनी अभिव्यक्त केलेल्या या मताचे प्रत्यंतर १९९० पर्यतच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवते. पुढे मात्र त्याची तीव्रता कमी कमी होत गेल्याचे दिसून येते. आज वर्तमान ग्रामीण साहित्यातून ही समूहभावना लोप पावत चालली आहे. याला अनेकविध कारणे सांगता येतील. त्याच अनुषंगाने पुढील मुद्यांच्या आधारे सविस्तर मांडणी करता येईल.

**बदलती अभिरूची : लेखकाला प्राप्त झालेली अप्रतिष्ठा :**

मानवी समाजावर पाश्चत्य संस्कृतीचा झंझावत इतका अवेगी आणि प्रभावी आहे की, माणूस आपल्या परंपरा आपली संस्कृती याला पद्धतशीरपणे विसरत चालला आहे. मुक्त अर्थव्यवस्था जागतिकीकरण, ग्लोबालायझेशन आणि तंत्रज्ञानाचा व प्रसारमाध्यमांचा हव्यास यातून

आपली वस्त्र, संस्कृती, खाद्य संस्कृती, रीतीरिवाज, सणसोहळे, कलासक्त मने या सर्वच क्षेत्रात' कमालीचा बदल होत गेला आहे. या बदलाचा साक्षीदार असणारा लेखकही याच समाजाचा एक घटक आहे. साहित्यातून सामाजिक आणि सांस्कृतिक संक्रमण होत असते. साहित्य समाजाला प्रबोधित करीत असते. याचा विसर आजच्या समाजाला पडलेला आहे नव्हे तर वाचन संस्कृतीचा होत चाललेला ऱ्हास सामाजिक उदासिनतेचे प्रतिक नव्हे तर काय ? एकूणच साहित्यभिरूचीला मारक ठरणारे वातावरण प्रचंड वेगाने फैलावत आहे. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला परंतू त्या प्रमाणात वाचन अभिरूची तेवढी रूजली नाही, वाढली नाही. या कारणाच्या मुळाशी जसजसे जावे तस तसे अनेक बाबी प्रकाशात येतात. समाजात होणाऱ्या या उलथापाथीचा लेखकाच्या अभिव्यक्तीवर परिणाम होऊन त्याच्या अभिव्यक्तीच्या परिसीमा बदलण्याची शक्ता कशी निर्माण होते. या संदर्भाने सांगताना डॉ.द.ता.भोसले म्हणतात, "संस्कृतीच्या आजवरच्या इतिहासात मानवी जीवनाचे एवढे भीषण अवमानीकरण, वस्तुकरण व पाश्वीकरण प्रथमच होत आहे आणि या साऱ्या विशग्ध पर्यावरणाचे आव्हान, आजच्या लेखकांसमोर उभे ठाकले आहे. कदाचित या साऱ्या वातावरणाचा लेखकाच्या अंत: स्फूर्तीवर आणि कल्पना शक्तीवरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही"[४] भोसले म्हणतात. त्याप्रमाणे लेखक या वास्तवाच्या ओझ्याखाली जसा दबला जातोय तसाच तो समाजाच्या बदलत्या विचारधारेचाही बळी पडत चालला आहे.

काही वर्षापूर्वी समाजात लेखकाला विशेष स्थान होते. त्याने मांडलेल्या मतमतांतराचा वेगवेळ्या पातळयावर विचार केला जात होता. एवढेच नाही तर शासन व्यवस्थेत त्याच्या अभिव्यक्तीतून उमटलेल्या प्रतिक्रियेची गांभीर्याने दखल घेतली जात होती. आज वर्तमानात मात्र त्याची प्रतिष्ठा, समाजामधला आदर दिवसेंदिवस हळूहळू कमी कमी होत चालला आहे. याची कारणे बदललेल्या जीवनव्यवस्थेत, मानसिकतेत जीवनमूल्यात जशी सापडतात. तशी लेखकाच्या व्यक्तीगत बाजूनेही सापडतात.

### भांडवली व्यवस्थेमुळे स्वकीय विरूद्धची लढाई :

भांडवली अर्थव्यवस्थेने ग्रामीण माणसाच्या जगण्यात कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. माणूस माणसापासून परावलंबी होत गेला. नाते संबंधाची वीण तुटत गेली. संवेदनशीलता संपुष्टात आली. ग्रामीण माणसांची आर्थिक गणित जशी चुकत गेली. तसेच त्यांच्या संवेदना, जाणीवा, मूक-बधीर झाल्या. स्वार्थ, मतलबीपणा यातून फसवणूक आणि विश्वास घातकी प्रवृत्ती वाढीस लागली. आपलेपणाची जाणीव संपुष्टात येत गेली. परिणामी, स्वकीयविरूद्धच्या लढाईस सुरूवात झाली. आपली माणसे सत्तेत असूनही आपले प्रश्न सुटत नाहीत, आपले शोषण थांबत नाही, दैन्य-दारिद्रय मानसिक गुलामगिरी, मनाचे गुदमरलेपण वाढीस लागून स्वकीयाविरुद्धच्या कार्यवाहीस वेग आला. परिणामी लेखकांच्या लेखकपणाला बंधिस्तपणा निर्माण झाला. ही भावना अधिकाधिक रूढ होत चालली आहे. परिणामी ग्रामीण साहित्याला एकाकीपण येत चालले आहे. हे थांबून त्याचे सार्वत्रिकीरण होणे खरेतर महत्त्वाचे वाटते.

आधुनिकता, शहरीकरण, यांत्रिकीकरण याविषयीच्या ग्रामीण लेखकाच्या भूमिकांचा विकास आणि विस्तार झाला तर ग्रामीण साहित्याची रूपरेषा बदलण्यास वेळ लागणार नाही. समकालीन जीवनाशी प्रश्नांशी एकरूप होऊन 'माझे नाही तर आमचे' ही विचारधारा रूजविली तर ग्रामीण साहित्याच्या कक्षा रुदंवण्यास वेळ लागणार नाही. यावरच ग्रामीण साहित्याची महत्ता कशी ठरणर आहे ते सांगताना श्रीराम गुंदेकर म्हणतात, "नव्या कृषि-तंत्रज्ञानाच्या भांडवली आक्रमणाचा आणि अस्सल ग्रामीण संस्कृतीच्या विनाशाचा संधीकाळ ग्रामीण समाजाला फार यातनामय असणार आहे. या दु:खावर महा-काव्ये, महा-कादंबऱ्या होऊ शकतील. या यातनामय, क्लेशदायक, शोकात्म, जीवनाकडे ग्रामीण साहित्यिक किती संवेदनशीलतेने, किती सहानुभावाने पाहील त्यावर त्याच्या कलाकृतीची महानता आणि साहित्यिकांची वाङ्मयीन महात्मा ठरणार आहे."[५] ग्रामीण साहित्यिकांच्या या अपेक्षांची परिपूर्ती करण्यासाठी वर्तमान ग्रामीण साहित्यिकांना आपल्या वर्तुळातून बाहेर पडून या उत्कट गतिमान होत चाललेल्या ग्रामीणजीवन वास्तवाला अधोरेखित करावे लागणार आहे.

### काळाच्या पटाबरोबर भाषिक बदलाचे प्रत्यंतर :

ग्रामीण साहित्याने मराठीला वेगवेगळ्या व्यक्तिरेखा दिल्या. वेशभुषा चालीरिती, सणउत्सव, परंपरा, प्रदेश, प्रदेशाचे विशेष पीकपद्धती, जगण्यातील वैविध्य अशी वैविध्यपूर्णता दिली. त्याचबरोबर कथनाचे नवे प्रकार निवेदनाचा तऱ्हा, प्रमाणभाषेच्या बंदिस्तपणाला मुक्त केले आणि स्वभाविक रूप दिले. ग्रामीण बोलीच्या वापराने प्रमाण भाषेला समृद्ध केले. तसेच तिला नाद, लय, ताल प्राप्त करून दिला. ग्रामीण साहित्याची भाषा काळाच्या पटाबरोबर बदलत गेली. प्रमाण भाषेबरोबर बोली भाषाही अभिव्यक्तीची भाषा होऊ शकते हे सिद्ध करून दाखविले.

१९७०-८० नंतरच्या काळात जसजसे शिक्षणाचे स्वरूप विस्तारत गेले आणि डोंगर दऱ्यात वाड्या वस्तीवर शिक्षण पोहोचले तसतसे खेड्यापाड्यापासून लिहिणारा आणि वाचणारा वर्ग वाढत गेला. जी भाषा दैनंदिन व्यवहारासाठी वापरली जाते. त्याच भाषेत लेखन केले जाऊ लागल्याने वाचक वर्गही वाढत गेला. अशा भाषिक प्रयोगातून लेखकांनीबोली भाषांचे संवर्धन केलेच शिवाय त्या त्या बोलीसोबत तेथील संस्कृती संवर्धित व संक्रमित केली. ग्रामीण बोलीभाषेमुळे त्या त्या बोलीतील म्हणी वाक्प्रचार, प्रतिमा-उपमा, कृषीव्यवसायातील शब्द ग्रामीण स्त्रियांच्या भावविश्वातील शब्द, व्याकरणिक रूपं, शैली या सर्व अंगांनी मराठी भाषा समृद्ध झाली. ग्रामीण साहित्यिकांनी अभिव्यक्तीच्या रूपाने बोलीभाषेला साहित्यात दिलेले स्थान भाषिक संवर्धनाच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाचे आहे. या बाबतीत डॉ.महेंद्र कदम यांनी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे वाटते ते म्हणतात, "आजच्या सांस्कृतिक आणि जागतिक आक्रमणाच्या काळात इंग्रजीचा प्रभाव महाराष्ट्रभर वाढता आहे. जगातील

ज्ञात भाषापैकी निम्म्या भाषा गेल्या पाचशे वर्षात नष्ट झाल्या आहेत. तशीच परिस्थिती मराठीच्या बोलींचीही आहे. त्या नष्ट होण्यापूर्वी किमान लेखनात येऊ लागल्या आहेत. ही सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची बाब आहे."[६] कदम यांनी मांडलेला विचार भाषा संवर्धन आणि समृद्ध करण्याच्या दृष्टीने विचारात घेणे काळाची गरज आहे.

**समारोप :**

सरतेशेवटी सारांश रूपाने असे सांगता येते की, स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेल्या ग्रामीण साहित्याने पिढी ग्रामीण साहित्याचा वेगवेगळ्या पातळ्यांवर विकास केला आहे. पहिल्या पिढीतील लेखकांनी फुले, आंबेडकर, मार्क्स यांच्या आवश्यक त्या विचारातील तत्वांचा समन्वय साधून लेखन केले. समाजातील वास्तव प्रश्नांना आपल्या लेखनाच्या केंद्रस्थानी ठेवले. हीच परंपरा घेऊन दुसरी पिढी लिहिती झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता, आधुनिकता, विज्ञाननिष्ठा, लोकशाही आणि मानवता ही आधुनिक युगाची मूल्ये केंद्रस्थानी ठेवून दुसऱ्या पिढीतील लेखकांनी ग्रामीण साहित्यात मात्र कमालीचा बदल घडून आला. समकालीन जीवन वास्तवाला अधोरेखित करताना ग्रामीणत्वाच्या संकल्पनाच बदलून गेल्याचे चित्र या काळातील साहित्यातून प्रामुख्याने प्रतिबिंबीत झाल्याचे दिसून येते.

मानवी जीवनात झपाट्याने होत जाणारा बदल, वाढत चाललेला भ्रष्टाचार, लोप पावत चाललेली चिरंतन जीवनमुल्ये, आतून नासत चाललेली माणूसकीची भावना अशा परिस्थितीत आजचा माणूस गोंधळून जातो आहे. लेखक आणि कवी तरी यास अपवाद कसे ?

**निष्कर्ष :**

१. ग्रामीण संवेदनशीलता ही नागर संवेदनशीलतेपेक्षा भिन्न असल्याचे जाणवते.
२. निसर्ग सन्मुखता ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी.
३. ग्रामीण माणूस कितीही संकटात सापडला तरी तो एकाकी होत नाही.
४. कृषीजन संस्कृतीचे चित्रण ग्रामीण साहित्याचा विशेषच नाही तर अंगभूत लक्षण आहे.
५. ग्रामीण साहित्य एक स्वतंत्र मूल्यव्यवस्था आहे.
६. समुहप्रधानता व्यापक सहानुभाव, समता, शोषणाला नकार या मूल्यांना महत्त्व देणारे साहित्य.
७. आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या अंगाने अनेक प्रयोग.
८. अनुभवाची नवी क्षितिजे मराठी साहित्यात प्रथमतःच आली.
९. ग्रामीण साहित्याने वेगवेगळ्या प्रादेशिक बोलीला प्रविष्ठा मिळवून दिली.
१०. भाषिक दृष्ट्या मराठी साहित्याला समृद्ध केले.
११. ग्रामीण साहित्याची चळवळ ऊर्जीतअवस्थेच्या प्रतिक्षेत.

**संदर्भसूची :**

१. डॉ.द.ता.भोसले, 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', मनोविकास प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, २००९, पृ.२९.
२. मोहन पाटील, 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, २००८, पृ.८१.
३. नागनाथ कोत्तापल्ले, 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९६, पृ.०७.
४. डॉ.द.ता.भोसले, 'साहित्य : आस्वाद आणि अनुभव' ग्रंथालय प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, २०१२, पृ.०६.
५. श्रीराम गुंदेकर, 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही', संपा.डॉ.वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, २००५, पृ.१८३
६. डॉ.महेंद्र कदम, 'ग्रामीण साहित्य आणि वास्तव' संपा.डॉ.कृष्णा इंगोले, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २०११, पृ.२६२